

कोल्हापुरात शुक्रवारी ताराराणी विद्यापीठातर्फे आयोजित व्याख्यानात बोलताना डॉ. आ. ह. साळुंखे. शेजारी प्रा. क्रांतिकुमार पाटील व श्री. रा. कृ. कणबरकर.

# संत तुकाराम यांना कर्मकांडात गुंडाळण्याचा चरित्रकारांचा प्रयत्न

20/3 98

## आ. ह. साळुंखेचे मत

कोल्हापूर, ता. २० : संत तुकारामांनी बाह्य कर्मकांडाचे महत्त्व नाकारले तरी त्यांच्या चरित्रकारांनी त्यांना या कर्मकांडामध्येच गुंडाळण्याचा प्रयत्न केला, अशी खंत ज्येष्ठ विचारवंत आ. ह. साळुंखे यांनी आज येथे व्यक्त केली. येथील ताराराणी विद्यापीठाच्यावतीने तुकाराम बीजनिमित्त आयोजित केलेल्या व्याख्यानात ते बोलत होते. 'बंडखोर तुकाराम' असा त्यांचा विषय होता.

श्री. साळुंखे म्हणाले, 'संत तुकारामांनी बाह्य कर्मकांड नाकारून मनाच्या शुद्धतेवर भर दिला. ते दैववादी नव्हते तर प्रयत्नवादी होते. भोळाभाबडा, व्यवहारशून्य माणूस याला संस्कार करता आला नाही, म्हणून तो ईश्वर भक्तीकडे वळला आहे असे तुकारामांचे जे वर्णन केले जाते ते धादांत खोटे आहे.' स्वातंत्र्याच्या चळवळीत झोकून देणाऱ्या माणसाला, सिद्धांतासाठी त्याच्या तत्वासाठी जसा संसार मोडतो, तसेच तुकारामांच्या बाबतीत झाले आहे. आर्थिक बाबतीत नि:स्पृह

केले. शरीराच्या मृत्यूपेक्षा विचारांचा मृत्यू फार घातक असतो, असे त्यांचे मत होते. जर बंडखोर तुकाराम जाणून घ्यायचे असतील तर तुकारामांच्या संघर्षाचे स्वरूप, धर्माबद्दलच्या त्यांच्या कल्पना काय होत्या ते समजावून घेणे आवश्यक आहे.'

प्रा. सौ. भारती शेळके यांनी प्रास्ताविक केले. जयश्री पाटील यांनी सूत्रसंचालन केले व कुसुम कवडे यांनी आभार मानले.